# नवमहाराष्ट्र विद्यालयात 'पोलिसांशी थेट भेट'

**पिंपरी : प्रतिनिधी**

पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'शाळांगण प्रकल्पां'तर्गत पिंपरी वाघिरे येथील नवमहाराष्ट्र विद्यालय आणि महाविद्यालयातील इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'पोलिसांशी थेट भेट' कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचा विषय छेडछाड, प्रेम-मैत्री, आकर्षण व कायदा असा होता. वयात येत असलेल्या मुला-मुलींना पॉस्को कायद्याविषयी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाची संकल्पना 'पंख'च्या अध्यक्षा स्मिता आपटे यांची होती. दामिनी पथकाच्या पोलीस मार्शल सुप्रिया पारसे, पोलीस मार्शल दीपक खुणवे व साळी उपस्थित होते. पंख संस्थेच्या समुपदेशकांनी चर्चेतून खरं प्रेम, निखळ मैत्री, करिअर, लग्न आणि सेटलमेंट अशा महत्त्वाच्या संकल्पना समजावून सांगितल्या. सुप्रिया पारसे यांनी सत्य घटनांचा उल्लेख करून मुलांना कसे वागावे, तसेच प्रेमसंबंध, शारीरिक संबंध, छेडछाड करणे अशा प्रकरणात होणाऱ्या शिक्षेबद्दल माहिती दिली. मुला-मुलींनीदेखील पोलिसांना अनेक प्रश्न विचारले.